## L. A. BILL No. X OF 2024.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LABOUR WELFARE FUND ACT.

## सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.

**महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५३ चा ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६बब ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमाच्या कलम ६बब मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९५३ चा ४०.

"(२) प्रत्येक नोकराच्या बाबतीत, आणि अशा प्रत्येक नोकरासाठी मालकाच्या बाबतीत, प्रत्येक सहा महिन्यांनी प्रदेय असलेल्या अंशदानाची रक्कम, पुढील दराने असेल :–

(अ) ज्या नोकराचे नाव, अनुक्रमे, दिनांक ३० जून व ३१ डिसेंबर रोजी, आस्थापनेच्या नोंदवहीत आहे अशा नोकराच्या बाबतीत, पंचवीस रुपये इतका दर असेल :

परंतु, राज्य शासन, मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नोकराच्या अंशदानाच्या दरात, प्रत्येक तीन वर्षांतून एकदा वाढ करील, तथापि, असे की, अशी वाढ, अंशदानाच्या दराच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक नोकरासाठी, मालकाच्या बाबतीत, नोकराने प्रदेय असलेल्या रकमेच्या तीनपट. " .

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील कामगारांच्या कल्याणास प्रोत्साहन देण्याच्या कार्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी आणि अशी कल्याणकारी कार्ये करण्यासाठी कल्याण निधी घटित करण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम (१९५३ चा ४०) अधिनियमित केला आहे.

२. नोकरांनी, मालकांनी तसेच राज्य शासनाने, दर सहा महिन्यांनी, निधीत करावयाच्या अंशदानासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ६बब च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केली आहे. कामगारांसाठी आणि त्यांच्या अवलंबितांसाठी कल्याणकारी कार्यांना प्रोत्साहन देण्याकरिता, उक्त त्रिपक्षीय अंशदान हे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे.

३. मंडळाने केलेल्या कल्याणकारी कार्यांमध्ये आणि कल्याणकारी कार्यांचा लाभ घेणाऱ्या कामगारांच्या व त्यांच्या अवलंबितांच्या संख्येत देखील गेल्या दशकांमध्ये भरीव प्रमाणात वाढ झाली आहे आणि तसेच वेतन व भत्त्यांच्या रुपाने कर्मचाऱ्यांच्या खर्चात देखील भरीव प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु, सन २००३ पासून निधीतील अंशदानाच्या दरामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही.

याशिवाय, मंडळाने, नवीन कल्याणकारी योजना, उपक्रम व कार्यक्रम सुरू करण्याच्या उपाययोजना केलेल्या आहेत. मंडळाने, कामगार व त्यांच्या अवलंबितांसाठी जिल्हा क्रिडा प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्याचे आणि क्रीडा स्पर्धा व शिबिरे आयोजित करण्याचे देखील योजिले आहे. म्हणून, अशा कामगार कल्याणकारी कार्यांना अर्थसहाय्य करणे आणि प्रशासकीय खर्चाचे प्रमाण राखणे मंडळाला शक्य व्हावे या दृष्टीने, नोकरांनी, मालकांनी तसेच राज्य शासनाने दर सहा महिन्यांनी उक्त निधीस प्रदेय असलेल्या अंशदानाच्या दरात वाढ करणे इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **सुरेश खाडे,**

दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४. कामगार मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड २.—**या खंडान्वये **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नोकराने प्रदेय असलेला अंशदानाचा दर, प्रत्येक तीन वर्षांतून एकदा अशा रकमेने वाढवण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे, तथापि, असे की, अशी वाढ, अंशदानाच्या प्रचलित दराच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## वित्तीय ज्ञापन

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून कल्याणकारी कार्यांमध्ये वाढ करण्यासाठी आणि महाराष्ट्र कामगार कल्याण निधी नियमांच्या नियम १९अ अन्वये तरतूद केलेल्या त्याच्या मर्यादेपर्यंत मंडळाच्या प्रशासकीय खर्चाचे प्रमाण राखण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम (१९५३ चा ४०) अन्वये कामगार कल्याण निधीतील त्रिपक्षीय अंशदानाच्या दरांमध्ये वाढ करणे हा, या विधेयकातील तरतुदींचा उद्देश आहे. नोकरांकडून, मालकांकडून व राज्य शासनाकडून कामगार कल्याण निधीला दर वर्षी प्रदेय असलेले एकूण त्रिपक्षीय अंशदान, सुमारे १६८,५४,००,००० इतके असल्याचे अंदाजित केले असून त्यापैकी, शासनाचे अंशदान, राज्याच्या एकत्रित निधीतील आवर्ती खर्च म्हणून, दर वर्षी, अंदाजे रुपये ५६,१८,००,००० इतके असेल.

२. तथापि, या तीन पक्षांपैकी, प्रत्येक पक्षाचे निश्चित अंशदान, अधिनियमाच्या कक्षेत येणाऱ्या नोकरांच्या संख्येतील फरकानुसार वर्षनिहाय बदलेल.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक, २०२४ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

## सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट

## (महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ यातील उतारे)

## (सन १९५३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० )

**१.** ते **५.** * * * *

**६.** ते **६अ.** * * * *

**६बब (१).** * * * * अंशदान.

**(२)** प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संदर्भात प्रत्येक सहा महिन्यांनी देय होणारी आणि अशा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संबंधात मालकाने द्यावयाची अंशदानाची रक्कम पुढील दराप्रमाणे देय असेल.—

(अ) (एक) दरमहा रुपये तीन हजार धरून, तीन हजारपर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या संबंधात, सहा रुपये आणि ;

(दोन) दरमहा रुपये तीन हजारपेक्षा अधिक वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या संबंधात, बारा रुपये ;

जर अशा कर्मचाऱ्याचे नाव, अनुक्रमे ३० जून आणि ३१ डिसेंबर रोजी, संस्थेच्या नोंदणी पुस्तकात असेल तरच वरीलप्रमाणे अंशदान देय असेल ;

" परंतु, शासनास मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त होताच, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कर्मचाऱ्याचा अंशदानाचा दर प्रत्येक तीन वर्षांतून एकदा अशा रितीने वाढविता येईल की, अशी वाढ अंशदानाच्या दराच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.";

"(ब) मालकाच्या बाबतीत, खंड (अ) च्या उप-खंड (एक) आणि (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याकरिता कर्मचाऱ्याकडून देय असलेल्या अंशदानाच्या रकमेच्या तिप्पट रक्कम.";

**(३)** ते **(८)** * * * *

**६ब.** * * * *

**७.** ते **२३.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.]**

**[महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[ **श्री. सुरेश खाडे,**
कामगार मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई